# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : शै.प्रवेश/6E3C

दिनांक: 9६.९.2013

प्रति,
मा. विभागप्रमुख
सर्व शैक्षणिक विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे — ४११ ००७.

विषय : एम.फिल./पीएच.डी. शिष्यवृत्ती बाबत.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोगाने UPE योजनेअंतर्गत विद्यापीठ विभागातील नॉन नेट विद्यार्थ्यांसाठी दि. ०२ जून २०१२ पासून नवीन दराने शिष्यवृत्ती (फेलोशिप) मंजूर केलेली आहे. (सोबत नियम व अटीबाबतचे परिपत्रक जोडत आहे). ज्या विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही योजनेअंतर्गत फेलोशिप मिळत नाही अशा शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मध्ये एम.फिल. /पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीसाठी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह व विभागप्रमुखांच्या शिफारशीसह शैक्षणिक प्रवेश विभागाकडे दि. १० ऑक्टोंबर २०१३ पर्यंत सादर करावेत. विहित मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत

सोबत अर्जाचा विहित नमुना जोडला आहे. शिष्यवृत्तीची आवेदन पत्रे खाली नमूद केलेली माहिती अभ्यासक्रम निहाय यादीसह स्वतंत्र्यरित्या पाठवावी.

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेश दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

तसेच आपल्या विभागातील शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांचे बिल फॉर्म, योजनेच्या नियम व अटींच्या पूर्ततेसह एकत्रिकरित्या उपरोक्त तक्त्यात विभागप्रमुखांच्या शिफारशीसह त्या त्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत या विभागात सादर करावेत.

याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला,

16/9/2013

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्रमांक : २१४/२०१३**

**विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांकरीता**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने UPE योजनेअंतर्गत विद्यापीठ विभागातील नॉन नेट विद्यार्थ्यांसाठी दि. ०२ जून २०१२ पासून नवीन दराने शिष्यवृत्ती (फेलोशिप) मंजूर केलेली आहे. यासंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये विद्यापीठातील शैक्षणिक विभागात एम.फिल. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा रू. ५०००/— व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०००/— प्रमाणे खालील नियम व अटी नुसार शिष्यवृत्ती (फेलोशिप) देण्यात येणार आहे.

१. विद्यापीठ अनुदान आयोगाने UPE अंतर्गत मंजूर केलेली सदर योजना दि. ३१ मार्च २०१७ पर्यंत लागू राहील.

२. विद्यापीठ विभागात एम.फिल. अभ्यासक्रमासाठी सन २०१२–१३ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांका पासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे १८ (अठरा) महिन्यांच्या कालावधीसाठी अथवा त्यांच्या नोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) दिनांकापासून शोधनिबंध सादर करण्याच्या तारखेपर्यंत अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेली सदर योजना लागू असे पर्यंत यामध्ये जे प्रथम घडेल तोपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

३. विद्यापीठ विभागात पीएच.डी अभ्यासक्रमासाठी सन २०१२–१३ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे चार वर्षांच्या कालावधीसाठी अथवा त्यांच्या नोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) दिनांकापासून प्रबंध सादर करण्याच्या तारखेपर्यंत अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेली सदर योजना लागू असे पर्यंत यामध्ये जे प्रथम घडेल तोपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

४. विद्यापीठ विभागातील पीएच.डी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विभागातील ज्या दोन विद्यार्थ्यांना यापूर्वी शिष्यवृत्ती देण्यात येते ते विद्यार्थीही सदर योजनेस पात्र राहतील.

५. प्रत्येक विद्यार्थ्यांची हजेरी दरमहा ७५% पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची हजेरी त्यांचे मार्गदर्शक व संबंधित विभागाप्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या पीएच.डी. प्रवेशीत विद्यार्थ्यांना प्रथम दोन वर्षाच्या कालावधीत एक लेख (Article) प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

७. विद्यार्थ्याने दर सहा महिन्याने प्रगती अहवाल (Progress Report) मा. विभागप्रमुख यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

८. सदर योजनेचा प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी आढावा घेण्यात येईल.

९. पीएच.डी/एम.फील. साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

१०. एम.फिल. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची पूर्णवेळ नोंदणी होणे आवश्यक आहे.

११. विद्यार्थ्याने इतर कोणत्याही दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

१२. विद्यार्थी पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी करीत नसावा.

१३. पीएच.डी व एम.फील. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी/एम.फिल. अभ्यासक्रमासाठी लागू असलेले सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ : शै. प्रवेश/ ७६३८
दिनांक : १६ / ९ / २०१३

16/9/2013
सहा.कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग